महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १०/एनजीपी/मान्यता/विलिनीकरण/२०२०/ ५५८

दिनांक : 20 AUG 2020

प्रति,
प्राचार्य/ संचालक,

१. मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे,
लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी,
ता. फुलांब्री, जि. औरंगाबाद. (डीटीई कोड-२५४७)

२. मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे,
लेट भगिरथी यशवतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ फार्मसी,
ता. फुलांब्री, जि. औरंगाबाद. (डीटीई कोड-२५८२)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या संस्था विलिनीकरण करण्यास मान्यता देणेबाबत.......

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : क्र. टीईएम-२०२०/प्र.क्र.९४/तांशि-४, दिनांक :११.८.२०२०.

उपरोक्त विषयावावत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या एका परिसरातील खालील तक्त्यात नमूद संस्था विलिन करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

अ.क्र.	विलीन झालेल्या संस्थांची नाव व डीटीई कोड	विलिनीकरणानंतर संस्थेच नाव व डीटीई कोड	विलिनीकरणानंतर राबविण्यात येणारे अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता
१.	मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे, लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी, ता. फुलांब्री, जि. औरंगाबाद. (डीटीई कोड-२५४७)	मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी, ता. फुलांब्री, जि. औरंगाबाद. (डीटीई कोड-२५४७)	पदवी १. बी फार्मसी पदविका २. डी. फार्मसी	 १०० ६०
२.	मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे, लेट भगिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ फार्मसी, ता. फुलांब्री, जि. औरंगाबाद. (डीटीई कोड-२५८२)			

Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar College of D.Pharmacy, Pathri, Tq.Phulambri, Dist.Aurangabad (D.Pharm & B.Pharm)

Scanned with CamScanner

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या एका परिसरातील उपरोक्त तक्त्यात नमूद संस्था विलिन करण्यास, विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदवी [B. Pharmacy] अभ्यासक्रमाची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे तसेच पदविका [D. Pharmacy] अभ्यासक्रमाची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, संचालनालयाने, संबंधीत विद्यापीठाने /महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.
५. संबंधित प्राधिकरणाचे आग प्रतिबंधक नाहरकत प्रमाणपत्र दिनांक २०.११.२०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
३. मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड - ४०२ १०३.
४. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
६. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
७. कार्यासन क्रमांक २, मुख्य कार्यालय, मुंबई.
८. कार्यासन क्रमांक २ अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
९. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
१०. निवड नस्ती.

Yashwantrao Pathrikar College of D.Pharmacy

Scanned with CamScanner